लोकमत

उषाराणी नारायण : विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या राष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ

# सांस्कृतिक एकारलेपण धोकादायक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : प्रादेशिक दूरचित्रवाणी वाहिन्यांनी बहुविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमांची रचना करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र 'बळी तो कान पिळी' या न्यायाने सांस्कृतिक एकारलेपणाचाच प्रचार त्यांच्याकडून सुरु आहे, हे धोकादायक आहे, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या माजी पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. उषाराणी नारायण यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्यांचे बीजभाषण झाले. वनस्पतिशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. 'प्रादेशिक वाहिन्यांमधील महिला'असा परिषदेचा विषय आहे. डॉ. नारायण म्हणाल्या, प्रादेशिक वाहिन्यांमुळे बातम्या पाहणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे, ही सुवार्ता असली तरी, त्या माध्यमांद्वारे त्यांची जी सार्वत्रिक प्रतिमा निर्माण केली जाते, ती मात्र अद्यापही लिंगभेदसापेक्षच आहे. प्रादेशिक आणि स्थानिक वाहिन्यांमुळे महिलांना दूरचित्रवाणीवर मोठी संधी प्राप्त झाली. त्यामुळे त्या या वाहिन्यांचा महत्त्वाचा आर्थिक कणा बनल्या आहेत.

या कार्यक्रमात डॉ. मृणाल चटर्जी यांनी संपादित केलेल्या 'महात्मा गांधी : एक पत्रकार आणि संपादक' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. संतोष चव्हाण यांनी तयार केलेल्या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. स्मितील पाटील यांनी मान्यवर पाहुण्यांची काढलेली रेखाचित्रे भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. ब्रेशील, संजीव भानावत, डॉ. मीरा के. देसाई, सोनल पांड्या, रवींद्र चिंचोलकर, वीरबाला अग्रवाल, अरुलचेल्व्हम श्रीराम, समीरण वाळवेकर, राजेंद्र हुंजे, शिवाजी जाधव, सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे उपस्थित होते. अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.



**शिवाजी विद्यापीठात गुरुवारी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या राष्ट्रीय परिषदेचा प्रारंभ झाला. त्यात डॉ. मृणाल चटर्जी लिखित पुस्तकाचे प्रकाशन प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून मीरा के. देसाई, सोनल पांड्या, अरुलचेल्व्हम श्रीराम, डॉ. चटर्जी, संजीव भानावत, वीरबाला अग्रवाल, निशा पवार-मुडे, रवींद्र चिंचोलकर उपस्थित होते.**

## कृती आराखडा आवश्यक

**प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, माध्यमांतील महिलांचा सहभाग हा पत्रकार, कॅमेऱ्यासमोरील व मागील कलाकार आणि प्रेक्षक म्हणून असा त्रिस्तरीय स्वरुपाचा असतो. त्यातील तिसऱ्या वर्गाला माध्यमांद्वारे राष्ट्रीय विकासात योगदान देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी कृती आराखडा निर्माण करणे आवश्यक आहे.**

# 'प्रादेशिक वाहिन्यांवरील महिलांची प्रतिमा चिंताजनक'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'प्रादेशिक वाहिन्यांद्वारे दाखविली जाणारी महिलांची प्रतिमानिर्मिती हा चिंतेचा विषय बनला आहे. मालिकांपासून ते अन्य मनोरंजन कार्यक्रमांमध्ये महिलांचे चित्रण चुकीचे किंवा कालसुसंगत नाही,' असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या माजी पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. उषाराणी नारायण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने 'प्रादेशिक वाहिन्यांमधील महिला' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेच्या उद्घाटन सत्रात बीजभाषण करताना डॉ. नारायण बोलत होत्या. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

डॉ. नारायण म्हणाल्या, 'प्रादेशिक आणि स्थानिक वाहिन्यांमुळे महिलांना दूरचित्रवाणीवर मोठी संधी प्राप्त झाली. त्यामुळे त्या या वाहिन्यांचा महत्त्वाचा आर्थिक कणा बनल्या आहेत. मात्र, त्यांचे येथील योगदान प्रागतिक स्वरूपाचे आहे की, वस्तूकरणाच्या पातळीपर्यंतच मर्यादित आहे, याचा चिकित्सक अभ्यास करण्याची गरज आहे. देशात जवळपास ८७७ हून अधिक वाहिन्या आहेत.



डॉ. उषाराणी नारायण

त्यामध्ये महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. तथापि, त्यांचे वस्तूकरणीय पारंपरिक प्रदर्शन हे असमानतेचे व शोषणाचेच द्योतक आहे.'

यावेळी डॉ. मृणाल चटर्जी यांच्या 'महात्मा गांधी : एक पत्रकार आणि संपादक' या पुस्तकाचे प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले. तसेच संतोष चव्हाण यांनी तयार केलेल्या विभागाच्या माहितीपटाचे प्रदर्शन करण्यात आले. स्मितील पाटील यांनी मान्यवर पाहुण्यांची काढलेली रेखाचित्रे भेट देऊन त्यांचे स्वागत केले. अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी श्रीलंका येथील साबरगामुआ विद्यापीठाचे प्रा. ब्रेशील, हरियाणातील एसजीटी विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. संजीव भानावत, डॉ. मीरा के. देसाई, डॉ. सोनल पांड्या, डॉ. रवींद्र चिंचोलकर, डॉ. वीरबाला अग्रवाल, डॉ. अरुलचेल्व्हम श्रीराम, पुण्यातील इएमआरसीचे माजी संचालक डॉ. समीरण वाळवेकर, वरिष्ठ पत्रकार राजेंद्र हुंजे यांच्यासह डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे यांच्यासह संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी

# प्रादेशिक वाहिन्यांमुळे होणारे सांस्कृतिक एकटेपण चिंताजनक

## उषाराणी नारायण; विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रादेशिक वाहिन्यांमुळे दूरचित्रवाणीचा सर्वदूर प्रसार झाला असला तरी त्यांच्या माध्यमातून प्रादेशिक स्तरावर होणारे सांस्कृतिक एकटेपण चिंताजनक आहे, असे प्रतिपादन म्हैसूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या माजी प्रमुख डॉ. उषाराणी नारायण यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र अधिविभाग सुवर्णमहोत्सव व आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'प्रादेशिक वाहिन्यांमधील महिला' या विषयावर दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. यावेळी डॉ. नारायण बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. नारायण म्हणाल्या, प्रादेशिक वाहिन्यांमुळे बातम्या पाहणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. त्या माध्यमांद्वारे त्यांची जी सार्वत्रिक प्रतिमा निर्माण केली जाते, ती मात्र अद्यापही लिंगभेदसापेक्षच आहे.

प्रादेशिक, स्थानिक वाहिन्यांमुळे महिलांना दूरचित्रवाणीवर मोठी संधी प्राप्त झाली. त्यामुळे महिला प्रसारमाध्यमांचा महत्त्वाचा आर्थिक कणा बनत आहेत. देशात सुमारे ८७७ हून अधिक वाहिन्या असून त्यात महिलांचे प्रमाण लक्षणीय आहे. दूरदर्शनवरील एका मालिकेद्वारे महिलांनी स्वातंत्र्य व समानतेचा संदेश घेतल्याचे सर्वेक्षण सांगते. मात्र, आजतागायत महिलांच्या सामाजिक स्थितीत तीळमात्रही फरक पडला नाही. आरुषी हत्याकांड, पुलवामा हल्ला, त्यांच्या वार्तांकनातही ही लिंगभेदसापेक्षता प्रकर्षाने जाणवते. याबाबत चिंतन होण्याची गरज आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, माध्यमांतील महिलांचा सहभाग हा पत्रकार, कॅमेऱ्यासमोरील व मागील कलाकार आणि प्रेक्षक म्हणून असा त्रिस्तरीय स्वरूपाचा असतो. पहिल्या दोन वर्गांतील महिलांचे प्रमाणही लक्षणीय असले तरी तिसऱ्या वर्गात त्यांचा समावेश सर्वाधिक आहे. या वर्गाला राष्ट्रीय विकासात योगदान देण्यासाठी प्रेरित करण्यासाठी कृती आराखडा करणे आवश्यक आहे.

अधिविभागप्रमुख डॉ. नीशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्रा. ब्रेशील, प्रा. संजीव भानावत, डॉ. मीरा के. देसाई, डॉ. सोनल पांड्या, डॉ. रवींद्र चिंचोलकर, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, चंद्रशेखर वानखेडे उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्यावतीने आयोजित जपानी कलावस्तू प्रदर्शन पाहताना डॉ., राजन गवस. सोबत डॉ. मेघा पानसरे, स्नेहल शेट्ये, डॉ.रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी

# ‘कलेतून संस्कृतीचा परिचय’

कोल्हापूर टाइम्स टीम

‘कलावस्तू प्रदर्शन हा एक अभिनव उपक्रम असून प्रेक्षकांना जपानी भाषा व संस्कृतीचा परिचय करून देण्याचे ते एक उत्तम माध्यम आहे,’ असे मत ज्येष्ठ साहित्यिक, मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्यावतीने वि. स. खांडेकर भाषा भवन येथे भरवण्यात आलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. गवस यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, स्नेहल शेट्ये, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

या प्रदर्शनात जपानी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी जपानी ध्वज, भाषा-चित्रलिपी, स्केचीस, ओरिगामी पद्धतीने बनवलेल्या कागदी कलावस्तू, प्रतिकात्मक सांस्कृतिक वस्तू, चित्रमय बालकथा पुस्तके, जपानी पंखे, कॅलीग्राफी, भित्तीपत्रे अशा विविध वस्तू मांडल्या. सुमधूर जपानी तंतूवाद्य संगीत व जपानी संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या चित्रफिती यामुळे प्रदर्शन दालनात जपानी वातावरण निर्माण झाले. या प्रदर्शनात स्वप्नील पाटील, पूनम नारकर, दीपिका भोसले, सचिन पाटील, अनुजा मिराशी, रुचा भोसले, सायली तळवडेकर, सिमरन कदम, मेहजाबीन शेख यांनी कलावस्तू सादर केल्या.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 MAR 2019

तरूण भारत

# वेब सामग्रीच्या सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

प्रतिनिधी

कोल्हापूर

वेब सामग्री, माहितीची सुरक्षितता टिकवून ठेवणे हे नजीकच्या काळात मोठे आव्हान असणार आहे. त्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन तांत्रिकी अधिकारी डॉ. एन. बी. दहीभाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील बॅ.खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय–माहितीशास्त्रच्या संयुक्त समारंभात 'इमर्जिंग ट्रेंडस् अँड टेक्नॉलॉजीज् इन लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

अध्यक्ष . स्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ई–लर्निंगच्याही पुढे जाऊन आता आता एम–लर्निंगचा जमाना आला. आहे. दररोज किमान तीन तास मोबाईलचा वापर केला जात आहे. डॉ. शालिनी लिहितकर यांनी स्वागत केले. डॉ. नमिता खोत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. दरम्यान सन १९६४ ते २०१८च्या आखेरपर्यंत विद्यापीठास सादर करण्यात आलेले ३४९६ शोधप्रबंध 'न्फिलबनेट'च्या 'शोधगंगा' या पोर्टलवर उपलब्ध केल्याचे सांगितले. डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले. यावेळी डॉ. डी.टी.शिर्के, विजापूर येथील डॉ. पी. जी. तडसद, हैद्राबाद येथील डॉ. के. विरनजेनिल्यू यांच्यासह विविध ठिकाणचे ९० हून अधिक सदस्य प्ररिषदेत सहभागी झाले.

**डॉ. एन. बी. दहीभाते यांचे प्रतिपादन**

# विद्यापीठात आज संगीत नाटक महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने सकाळी दहा वाजता संगीत नाटक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गायिका मधुवंती देव यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होईल. प्रथम सत्रात सकाळी ११ वाजता त्यांचे व्याख्यान व गायन होईल. द्वितीय सत्रात दुपारी दोन वाजता जयपूर अत्रौली घराण्याचे बुजुर्ग गायक पं. अरुण कुलकर्णी यांचे गायन होईल. तिसऱ्या सत्रात दुपारी तीन वाजता नाट्यदिग्दर्शक अनिरुद्ध खुटवड यांचे 'नाटक व अभिनयातील मूलतत्त्वे' या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी साडेचार वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे 'कलासंगम' हे सादरीकरण होणार आहे.